**किशोरी शक्ती योजना हया केंद्र पुरस्कृत**
**योजनेच्या अंमलबजावणीबाबत ...**

# महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक एबावि २००५/प्रक्र २३८ /का - ५
नवीन प्रशासन भवन , ३ रा माळा,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : - १४ सप्टेंबर , २००६.

**वाचा:-** (१) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: एबावि- २००३/ प्र.क्र. २८३/ का - ५ दि.१५.५.२००४.
(२) महिला व बाल विकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक: एबावि- २००३/ प्र.क्र. २८३/ का - ५ दि.३१.३.२००५
(३) भारत सरकार, मनुष्य बळ विकास मंत्रालय, महिला व बाल विकास विभाग,नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक ९-१६ (१५) / २००५- KSY, दिनांक २.९.२००५.
(४) भारत सरकार, मनुष्य बळ विकास मंत्रालय, महिला व बाल विकास विभाग,नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक ९-१३ (१५) / २००५- KSY, दिनांक ४.१.२००६.

**प्रस्तावना :-** एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्रांत ११ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलींना पोषण आरोग्यविषयक दर्जा, स्वच्छता, अनौपचारिक शिक्षण इ. विषयावर संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी ८८ प्रकल्पात अंगणवाडी सेविकांच्या पर्यवेक्षणाखाली स्थानिक **बालिका मंडळ** स्थापन करुन किशोरी शक्ती योजनेची अंमलबजावणी करणेबाबत संदर्भाधीन दि. १५ मे २००४ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.परंतू, सदर ८८ प्रकल्पांपैकी यवतमाळ जिल्हयातील माहूलगाव आणि बाभूळगाव हे दोन वेगवेगळे प्रकल्प नसून एकच प्रकल्प असल्याने तसेच उस्मानाबाद जिल्हयातील परंदा नावाचे दोन प्रकल्प नसल्याने एकूण ८८ प्रकल्पांपैकी सध्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ८६ प्रकल्पात किशोरी शक्ती योजना बालिका मंडळ पध्दतीने राबविण्यात येत आहे. किशोरी शक्ती योजनेंअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या सदर ८६ प्रकल्पाव्यतिरिक्त आणखी ३३० प्रकल्पात किशोरी शक्ती योजना राबविणेबाबत केंद्र शासनाने दि. २.९.२००५ च्या पत्रान्वये राज्य शासनास कळविले आहे. सदर योजनेची अंमलबजावणी **Girl to Girl Approach** पध्दतीने करण्याबाबतच्या *Plan of Action* ला केंद्र शासनाने संदर्भाधीन दि. ४.१.२००६ च्या पत्रान्वये मान्यता दिलेली आहे. त्यामुळे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत सध्या किशोरी शक्ती योजना राबविणारे ८६ प्रकल्प व केंद्र शासनाने मंजूर केलेले नवीन ३३० प्रकल्प असे एकूण ४१६ (८६+३३०) प्रकल्पात किशोरी शक्ती योजनेची अंमलबजावणी **Girl to Girl Approach** या पध्दतीने करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने संदर्भाधीन क्र. १ व २ वरील शासन निर्णय अधिक्रमीत करुन पुढीलप्रमाण आदेश देण्यात येत आहे.

**शासन निर्णय** :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ग्रामीण / आदिवासी आणि नागरी क्षेत्रातील सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** मध्ये नमूद केलेल्या ४१६ प्रकल्पात **Girl to Girl Approach** पध्दतीने किशोरी शक्ती योजनेची अंमलबजावणी करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. **किशोरी शक्ती योजनेची उद्दिष्टे:-**

२.१) ११ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलींचा पोषण व आरोग्य विषयक दर्जा सुधारणे.

२.२) किशोरवयीन मुलींना घरगुती व व्यवसायभिमुख प्रशिक्षण देऊन त्यांना प्रशिक्षित करणे व अर्थार्जनासाठी सक्षम बनविणे.

२.३) किशोरवयीन मुलींना आरोग्य, पोषण, कुटुंब'कल्याण, गृह व्यवस्थापन, बाल संगोपन, व व्यक्तिगत आणि परिसर स्वच्छता इ० विषयीचे शिक्षण देऊन त्यांना जागृत करणे व बाल विवाहास प्रतिबंध करणे.

२.४) किशोरवयीन मुलींना निर्णयक्षमता वाढविण्याच्या दृष्टीकोनातून अनौपचारिक शिक्षण देणे.

३) **लाभार्थी निकष व निवड :-**

३.१) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ग्रामीण / आदिवासी आणि नागरी क्षेत्रातील सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार ४१६ प्रकल्पात किशोरी शक्ती योजना ही केंद्र पुरस्कृत योजना **Girl to Girl Approach** या पध्दतीने राबविण्यात यावी.

३.२) या योजनेंतर्गत प्रत्येक परिक्षेत्रातून ११ ते १८ वर्षे वयोगटातील २० किशोरवयीन मुलींची ६ महिन्याकरीता निवड करण्यात यावी. त्यापैकी १५ ते १८ वर्षे वयोगटातील ३ किशोरवयीन मुलींना अंगणवाडी केंद्राशी संलग्न ठेवण्यात यावे व त्यांना अंगणवाडीच्या प्रत्येक कार्यक्रमात सहभागी करुन घेण्यात यावे . सदर तीन किशोरवयीन मुलींची निवड करताना दारिद्रय रेषेखालील, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, तसेच शाळा सोडलेल्या किशोरवयीन मुली यांना प्राधान्य देण्यात यावे.

३.३) ग्रामीण, आदिवासी आणि नागरी प्रकल्पात सदर मुलींची निवड पर्यवेक्षिकेने बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली १५ दिवसांच्या आत करण्यात यावी.

४) **किशोरी शक्ती योजनेंतर्गत किशोरवयीन मुलींना देण्यात येणाऱ्या सेवा खालीलप्रमाणे राहतील.**

४.१) अंगणवाडी सेविका व परिचारिका यांच्या देखरेखीखाली किशोरी शक्ती योजनेंतर्गत प्रकल्पातील सरासरी ११ ते १८ वर्षे वयोगटातील निवड केलेल्या सर्व २० किशोरवयीन मुलींना लोहयुक्त गोळया (IFA Tablets) आठवडयातून एकदा व जंतनाशक गोळया (Deworming Tablets) सहा महिन्यातून एकदा देण्यात येतील.

४.२) किशोरवयीन मुलींचे दरमहा नियमितपणे वजन घेण्यात यावे तसेच त्या मुलींचे रक्त तपासणी (हिमोग्लोबिनच्या प्रमाणासाठी )करण्यात यावी व त्याची दरमहा अंगणवाडीत नोंद ठेवण्यात यावी.

४.३) या योजनेंतर्गत **Girl to Girl Approach** या पध्दतीनुसार मुख्यसेविका व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी निवड केलेल्या किशोरवयीन मुलींपैकी दारिद्रय रेषेखालील १५ ते १८ वर्षे वयोगटातील ३ मुलींचे बीट स्तरावर एकत्रित प्रशिक्षण/ शिबीर घेण्यात यावे. या मुलींचे प्रशिक्षण घेऊन झाल्यानंतर त्यांचेमार्फत अंगणवाडी स्तरावर परिक्षेत्रातील इतर किशोरवयीन मुलांना प्रशिक्षीत करण्यात यावे.

४.४) मुख्य सेविका यांनी गृह विज्ञान महाविद्यालय/ गृहविज्ञान, आरोग्य विभाग, वैद्यकिय महाविद्यालयातील विषयतज्ञ / वैद्यकीय अधिकारी यांचेशी संपर्क साधून त्यांचे मार्फत भाषणे, प्रात्यक्षिक, प्रदर्शन शिबिरे अथवा प्रशिक्षण आयोजित करावेत. या योजनेंतर्गत आरोग्य ,पोषण शिक्षण, वैयक्तिक स्वच्छता, परिसर स्वच्छता, सामुदायिक पोषण, मासिक पाळी त्यांचे विज्ञान, स्वच्छता, गैरसमज, गर्भावस्था मागील शरीर शास्त्र, गर्भनिरोधन, बालविवाहाचे परिणाम,लैंगिक छळ अशा परिस्थितीत कोणाची मदत घ्यावी, हेल्पलाईनचा उपयोग, एडस नियंत्रण व प्रतिबंध स्त्रीविषयक कायदे व हक्क; विवाह कायदे. इ० विषयांबाबत प्रबोधन करण्यात यावे. तसेच याकरिता अंगणवाडयामध्ये वाटप करण्यात आलेली पुस्तके, भिती पत्रके यांचा वापर करण्यात यावा.

४.५) किशोरवयीन मुलींना स्वयंपूर्ण करण्याकरीता त्यांना कौशल्य प्राप्त व्हावे याकरीता खालीलप्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात यावे.उदा. मेहंदी काढणे, कचऱ्यातून कला, जैविक शेती, गांडूळ खत, अकाऊंट किपींग, घरगुती विजेच्या उपकरणांची दुरुस्ती प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत बदलत्या काळानुसार आवश्यक ते तांत्रिक ज्ञान मुलींना गरजेनुसार देण्यात यावे.

४.६) किशोरी शक्ती योजनेंतर्गत लाभार्थी किशोरवयीन मुलींपैकी मध्येच शाळा सोडलेल्या किशोरवयीन मुलींना अंगणवाडी केंद्रात **कार्यरत शिक्षण** (Functional Literacy) देऊन त्यांना पुन्हा शालेय शिक्षणासाठी उद्युक्त करण्यास्तव अंगणबाडी स्तरावर शालेय उपक्रम राबविण्यात यावेत.

४.७) किशोरी शक्ती योजनेंतर्गत **Girl to Girl Approach** या पध्दतीनुसार अंगणवाडी केंद्राशी संलग्न ठेवण्यात आलेल्या फक्त ३ किशोरवयीन मुलींना पूरक पोषण आहार देण्यात यावा. तथापि किशोरी शक्ती योजनेंतर्गत लाभार्थ्यांना पूरक पोषण आहार देण्यासंदर्भात आर्थिक तरतूद करुन त्यानुसार स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील. त्यानंतरच लाभार्थ्यांना आहार देण्याची कार्यवाही करण्यात यावी. तथापि किशोरवयीन मुलींना प्रशिक्षण व इतर सेवा देण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही सुरु करण्यात यावी.

५. **योजनेचे संनियंत्रण (Monitoring) -**

५.१) किशोरी शक्ती योजना या केंद्र पुरस्कृत योजनेच्या अंमलबजावणीसाठी ग्रामीण व आदिवासी प्रकल्पासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण) जिल्हा परिषद हे जबाबदार अधिकारी राहतील.

५.२) नागरी प्रकल्पात या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित उपायुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई हे जबाबदार अधिकारी राहतील.

५.३) या योजनेचे प्रत्यक्ष संनियंत्रण व अंमलबजावणी संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत करण्यात येईल.

५.४) या योजनेंतर्गत किशोरवयीन मुलींना योजनेचा लाभ दिल्यासंदर्भाची कागदपत्रे अंगणवाडीत ठेवण्यात यावीत आणि त्याप्रमाणे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

५.५) ग्रामीण व आदिवासी प्रकल्पांचे बाल विकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) यांचेमार्फत केंद्रशासनाने विहीत केलेल्या विहीत प्रपत्रात किशोरवयीन मुलींसंदर्भात माहिती आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेकडे पाठवावी. नागरी प्रकल्पामध्ये संबंधित बाल विकास प्रकल्प अधिका-यांनी संबंधित उपायुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई यांचेमार्फत पाठवावी.

५.६) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी सर्व प्रकल्पाची एकत्रित स्वरुपातील माहिती एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या मासिक प्रगती अहवालात राज्य शासनाकडे आणि केंद्र शासनाकडे पाठवावी.

६. **आर्थिक तरतूद -**

किशोरी शक्ती योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी केंदशासनामार्फत प्रति वर्षी प्रति प्रकल्प रु.१.१० लाख इतका निधी राज्य शासनास उपलब्ध करुन देण्यात येणार असून त्यानुसार राज्यातील ४१६ प्रकल्पांमध्ये सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता सन २००६-२००७ या चालू वित्तीय वर्षात रु.४,५७,६०,००० / - (रु.चार कोटी सत्तावन्न लाख साठ हजार फक्त) एवढा खर्च करण्यास शासन मान्यता देत असून आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई यांना नियंत्रक तथा आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत ग्रामीण व आदिवासी प्रकल्पासाठी होणारा खर्च मागणी क्र.एक्स-१ मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार,-०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, केंद्र पुरस्कृत योजना, ग्रामीण व आदिवासी (०४)(०१), महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या

कलम १२३ व २६१ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदाने [२२३६००७२] [स्थानिक क्षेत्र] ४१ सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीतून तसेच नागरी प्रकल्पासाठी होणारा खर्च उपरोक्त मुख्य लेखाशिर्षाखालील केंद्रपुरस्कृत योजना (०१)(०३) एकात्मिक बालविकास सेवा योजना (२२३६०५१९), ४१ सहाय्यक अनुदाने या उपलेखाशीर्षाखालील मंजूर तरतूदीतुन भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र ४७५ /०६ /व्यय-६, दि.११.०८.२००६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

वैअपारकर

( वै.अ.पारकर )
उप सचिव

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन,मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई.
मा.मंत्री /मा.राज्यमंत्री , (महिला व बाल विकास ) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव, [व्यय], वित्त विभाग,मंत्रालय,मंबई
प्रधान सचिव, [वित्त], वित्त विभाग,मंत्रालय,मंबई
प्रधान सचिव, नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,रायगड भवन,नवी मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,
महालेखापाल,महाराष्ट्र १ /२ [लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा] मुंबई. / नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
उपमुख्य कार्यकारी अधिकारी [बाल कल्याण] जिल्हा परिषद [सर्व]
मुख्यलेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा,कोकण भवन,नवी मुंबई.
सचिव, महिला व बाल विकास यांचे स्वीय सहाय्यक
उपसचिव, महिला व बाल विकास यांचे स्वीय सहाय्यक
कार्यासन (का-४, का-६), महिला व बाल कल्याण विभाग.
निवड नस्ती कार्यासन - ५

एच-1514(400-9-2006)-3

## परिशिष्ट--अ (शासन निर्णय क्रमांक-एबावि २००५/प्र.क्र.२३८/का.५ दि. १४.०९.२००६ चे परिशिष्ट)

किशोरी शक्ती योजनेंतर्गत ४१६ प्रकल्पांची यादी

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | प्रकल्पाचे नाव | प्रकल्पाचा प्रकार | अ.क्र. | जिल्हयाचे नाव | प्रकल्पाचे नाव | प्रकल्पाचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अहमदनगर | अहमदनगर | ग्रामीण | ३९ | अमरावती | धामणगाव रेल्वे | ग्रामीण |
| २ | अहमदनगर | जामखेड | ग्रामीण | ४० | अमरावती | अमरावती -१ | नागरी |
| ३ | अहमदनगर | कोपरगाव | ग्रामीण | ४१ | बीड | आंबेजोगाई | ग्रामीण |
| ४ | अहमदनगर | नेवासा | ग्रामीण | ४२ | बीड | बीड | ग्रामीण |
| ५ | अहमदनगर | पारनेर | ग्रामीण | ४३ | बीड | बीड | नागरी |
| ६ | अहमदनगर | पाथर्डी | ग्रामीण | ४४ | बीड | माजलगाव | ग्रामीण |
| ७ | अहमदनगर | राहुरी | ग्रामीण | ४५ | बीड | पातोडा | ग्रामीण |
| ८ | अहमदनगर | श्रीगोंदा | ग्रामीण | ४६ | बीड | वडवणी | ग्रामीण |
| ९ | अहमदनगर | श्रीरामपूर | ग्रामीण | ४७ | बीड | शिरुर - (कासर) | ग्रामीण |
| १० | अहमदनगर | रहाता | ग्रामीण | ४८ | बीड | परळी | ग्रामीण |
| ११ | अहमदनगर | अकोले | ग्रामीण | ४९ | बीड | गेवराई | ग्रामीण |
| १२ | अहमदनगर | संगमनेर | ग्रामीण | ५० | बीड | केज | ग्रामीण |
| १३ | अहमदनगर | अहमदनगर | नागरी | ५१ | बीड | आष्टी | ग्रामीण |
| १४ | अहमदनगर | शेवगाव | ग्रामीण | ५२ | भंडारा | भंडारा | ग्रामीण |
| १५ | अहमदनगर | कर्जत | ग्रामीण | ५३ | भंडारा | लाखनदूर | ग्रामीण |
| १६ | अकोला | अकोला | ग्रामीण | ५४ | भंडारा | मोहाडी | ग्रामीण |
| १७ | अकोला | अकोला (शहर ) | नागरी | ५५ | भंडारा | पवनी | नागरी |
| १८ | अकोला | अकोट | ग्रामीण | ५६ | भंडारा | साकोली | ग्रामीण |
| १९ | अकोला | बालापूर | ग्रामीण | ५७ | भंडारा | भंडारा+पवनी | ग्रामीण |
| २० | अकोला | बार्शीटाकळी | ग्रामीण | ५८ | भंडारा | तुमसर | ग्रामीण |
| २१ | अकोला | मुर्तीजापूर | ग्रामीण | ५९ | बुलढाणा | बुलढाणा+मलकापूर | नागरी |
| २२ | अकोला | पातूर | ग्रामीण | ६० | बुलढाणा | बुलढाणा | ग्रामीण |
| २३ | अकोला | तेल्हारा | ग्रामीण | ६१ | बुलढाणा | चिखली | ग्रामीण |
| २४ | अकोला | अचलपूर | ग्रामीण | ६२ | बुलढाणा | देऊळगाव राजा | ग्रामीण |
| २५ | अमरावती | अचलपूर+दर्यापूर | नागरी | ६३ | बुलढाणा | जळगाव (जामोद) | ग्रामीण |
| २६ | अमरावती | अमरावती | नागरी | ६४ | बुलढाणा | खामगाव | ग्रामीण |
| २७ | अमरावती | अमरावती | ग्रामीण | ६५ | बुलढाणा | लोणार | ग्रामीण |
| २८ | अमरावती | अंजनगाव | ग्रामीण | ६६ | बुलढाणा | मलकापूर | ग्रामीण |
| २९ | अमरावती | भातकुली | ग्रामीण | ६७ | बुलढाणा | मेहेकर | ग्रामीण |
| ३० | अमरावती | चांदूर (बार) | ग्रामीण | ६८ | बुलढाणा | नंदूरा | ग्रामीण |
| ३१ | अमरावती | चांदूर (रेल्वे ) | ग्रामीण | ६९ | बुलढाणा | संग्रामपूर | ग्रामीण |
| ३२ | अमरावती | चिखलदरा | आदिवासी | ७० | बुलढाणा | शेगाव | ग्रामीण |
| ३३ | अमरावती | दर्यापूर | ग्रामीण | ७१ | बुलढाणा | सिंदखेड राजा | ग्रामीण |
| ३४ | अमरावती | धारणी | आदिवासी | ७२ | बुलढाणा | मोताळा | ग्रामीण |
| ३५ | अमरावती | मोर्शी | ग्रामीण | ७३ | चंद्रपूर | भद्रावती | ग्रामीण |
| ३६ | अमरावती | नंदगाव | ग्रामीण | ७४ | चंद्रपूर | ब्रम्हपूरी | आदिवासी |
| ३७ | अमरावती | तिवसा | ग्रामीण | ७५ | चंद्रपूर | चंद्रपूर | आदिवासी |
| ३८ | अमरावती | वरुड | ग्रामीण | ७६ | चंद्रपूर | चंद्रपूर (शहरी) | नागरी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७७ | चंद्रपूर | चिमूर | आदिवासी | ११५ | जळगाव | जळगाव+भुसावळ+ चाळीसगाव+ अमळनेर | नागरी |
| ७८ | चंद्रपूर | गोडपिंपरी | आदिवासी | ११६ | जळगाव | चाळीसगाव | ग्रामीण |
| ७९ | चंद्रपूर | मूल | ग्रामीण | ११७ | जळगाव | चोपडा | आदिवासी |
| ८० | चंद्रपूर | नागभिड | ग्रामीण | ११८ | जळगाव | अमळनेर | ग्रामीण |
| ८१ | चंद्रपूर | राजूरा | आदिवासी | ११९ | जळगाव | भादगाव | ग्रामीण |
| ८२ | चंद्रपूर | सिंदेवाही | ग्रामीण | १२० | जळगाव | पाचोरा | ग्रामीण |
| ८३ | चंद्रपूर | वरोरा | ग्रामीण | १२१ | जळगाव | पारोळा | ग्रामीण |
| ८४ | चंद्रपूर | बल्लारपूर | आदिवासी | १२२ | जळगाव | एदलाबाद | ग्रामीण |
| ८५ | धुळे | धुळे | ग्रामीण | १२३ | जळगाव | एरंडोल | ग्रामीण |
| ८६ | धुळे | धुळे (शहर) | नागरी | १२४ | जळगाव | रावेर | ग्रामीण |
| ८७ | धुळे | साक्री | आदिवासी | १२५ | जळगाव | जळगाव | ग्रामीण |
| ८८ | धुळे | शिरपूर | ग्रामीण | १२६ | जळगाव | जामनेर | ग्रामीण |
| ८९ | धुळे | सिंदखेडा | ग्रामीण | १२७ | जळगाव | यावल | ग्रामीण |
| ९० | गडचिरोली | अहेरी | आदिवासी | १२८ | जळगाव | धरणगाव | ग्रामीण |
| ९१ | गडचिरोली | आरमोरा | आदिवासी | १२९ | जालना | जालना | नागरी |
| ९२ | गडचिरोली | चामोर्शी | आदिवासी | १३० | जालना | बदनापूर | ग्रामीण |
| ९३ | गडचिरोली | धनोरा | आदिवासी | १३१ | जालना | भोकरदन | ग्रामीण |
| ९४ | गडचिरोली | एटापल्ली | आदिवासी | १३२ | जालना | घनसवंगी | ग्रामीण |
| ९५ | गडचिरोली | गडचिरोली | आदिवासी | १३३ | जालना | मंथा | ग्रामीण |
| ९६ | गडचिरोली | कुरखेडा | आदिवासी | १३४ | जालना | अंबड | ग्रामीण |
| ९७ | गडचिरोली | सिरोंचा | आदिवासी | १३५ | जालना | परतूर | ग्रामीण |
| ९८ | गडचिरोली | मुलचेरा | आदिवासी | १३६ | जालना | जाफराबाद | ग्रामीण |
| ९९ | गडचिरोली | भामरागड | आदिवासी | १३७ | जालना | जालना | ग्रामीण |
| १०० | गडचिरोली | देसाईगंज- वडसा | आदिवासी | १३८ | कोल्हापूर | अजरा | ग्रामीण |
| १०१ | गोंदिया | आमगाव | ग्रामीण | १३९ | कोल्हापूर | गगनबावडा | ग्रामीण |
| १०२ | गोंदिया | अर्जुनी+मोर | ग्रामीण | १४० | कोल्हापूर | भुदरगड | ग्रामीण |
| १०३ | गोंदिया | देवरी | ग्रामीण | १४१ | कोल्हापूर | चांदगड | ग्रामीण |
| १०४ | गोंदिया | गोंदिया | ग्रामीण | १४२ | कोल्हापूर | गडहिंग्लज | ग्रामीण |
| १०५ | गोंदिया | गोरेगाव | ग्रामीण | १४३ | कोल्हापूर | हातकलंगले | ग्रामीण |
| १०६ | गोंदिया | सालेकसा | आदिवासी | १४४ | कोल्हापूर | कागल | ग्रामीण |
| १०७ | गोंदिया | तिरोडा | ग्रामीण | १४५ | कोल्हापूर | करवीर | ग्रामीण |
| १०८ | गोंदिया | सडक अर्जूनी | आदिवासी | १४६ | कोल्हापूर | पन्हाळा | ग्रामीण |
| १०९ | हिंगोली | कळमनुरी | ग्रामीण | १४७ | कोल्हापूर | राधानगरी | ग्रामीण |
| ११० | हिंगोली | बसमत | ग्रामीण | १४८ | कोल्हापूर | शाहूवाडी | ग्रामीण |
| १११ | हिंगोली | हिंगोली | ग्रामीण | १४९ | कोल्हापूर | शिरोळ | ग्रामीण |
| ११२ | हिंगोली | सेनगाव | ग्रामीण | १५० | कोल्हापूर | कोल्हापूर (शहर) | नागरी |
| ११३ | हिंगोली | औंढा नागनाथ | ग्रामीण | १५१ | कोल्हापूर | कोल्हापूर+ इचलकरंजी | नागरी |
| ११४ | जळगाव | भुसावळ | ग्रामीण | १५२ | लातूर | अहमदपूर | ग्रामीण |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १५३ | लातूर | औसा | ग्रामीण | १९१ | नागपूर | भिवापूर | ग्रामीण |
| १५४ | लातूर | चाकुर | ग्रामीण | १९२ | नागपूर | हिंगना | ग्रामीण |
| १५५ | लातूर | लातूर | ग्रामीण | १९३ | लातूर | औसा | ग्रामीण |
| १५६ | लातूर | निलंगा | ग्रामीण | १९४ | नागपूर | १) नागपूर | ग्रामीण |
| १५७ | लातूर | रेनापूर | ग्रामीण | १९५ | नागपूर | कमलेश्वर | ग्रामीण |
| १५८ | लातूर | देवनी | ग्रामीण | १९६ | नागपूर | कामठी | ग्रामीण |
| १५९ | लातूर | उदगीर | ग्रामीण | १९७ | नागपूर | काटोल | ग्रामीण |
| १६० | लातूर | लातूर+उदगीर | नागरी | १९८ | नागपूर | मौदा | ग्रामीण |
| १६१ | लातूर | जलकोट | नागरी | १९९ | नागपूर | कुही | ग्रामीण |
| १६२ | मुंबई | अंधेरी | नागरी | २०० | नागपूर | नागपूर+कामठी+वाडी | नागरी |
| १६३ | मुंबई | वरळी | नागरी | २०१ | नागपूर | नागपूर शहर नं.१ | नागरी |
| १६४ | मुंबई | धारावी | नागरी | २०२ | नागपूर | नागपूर शहर नं.२ | नागरी |
| १६५ | मुंबई | कुर्ला | नागरी | २०३ | नागपूर | नागपूर शहर नं.३ | नागरी |
| १६६ | मुंबई | जोगेश्वरी | नागरी | २०४ | नागपूर | नागपूर-१ | नागरी |
| १६७ | मुंबई | घाटकोपर | नागरी | २०५ | नागपूर | नागपूर-२ | नागरी |
| १६८ | मुंबई | मानखुर्द | नागरी | २०६ | नागपूर | नारखेड | ग्रामीण |
| १६९ | मुंबई | गोवंडी | नागरी | २०७ | नागपूर | पारशिवनी | ग्रामीण |
| १७० | मुंबई | अंधेरी नं.२ | नागरी | २०८ | नागपूर | रामटेक | आदिवासी |
| १७१ | मुंबई | अंधेरी नं.३ | नागरी | २०९ | नागपूर | सावनेर | ग्रामीण |
| १७२ | मुंबई | बांद्रा (पश्चिम) | नागरी | २१० | नागपूर | उमरेड | ग्रामीण |
| १७३ | मुंबई | भांडूप (पूर्व) | नागरी | २११ | नांदेड | लोहा | ग्रामीण |
| १७४ | मुंबई | भांडूप (पश्चिम) | नागरी | २१२ | नांदेड | अर्धपूर | ग्रामीण |
| १७५ | मुंबई | घाटकोपर नं-२ | नागरी | २१३ | नांदेड | हिमयात नगर | ग्रामीण |
| १७६ | मुंबई | गोरेगाव (पूर्व) | नागरी | २१४ | नांदेड | माहूर | आदिवासी |
| १७७ | मुंबई | गोरेगाव (पश्चिम) | नागरी | २१५ | नांदेड | उमरी | ग्रामीण |
| १७८ | मुंबई | खार -(प), सांताक्रुझ | नागरी | २१६ | नांदेड | नांदेड (शहर) | नागरी |
| १७९ | मुंबई | मुलुंड (पूर्व) | नागरी | २१७ | नांदेड | बिलोली | ग्रामीण |
| १८० | मुंबई | मुलुंड (पश्चिम) | नागरी | २१८ | नांदेड | कंधार | ग्रामीण |
| १८१ | मुंबई | प्रभादेवी | नागरी | २१९ | नांदेड | भोकर | ग्रामीण |
| १८२ | मुंबई | लालबत्ती एरिया | नागरी | २२० | नांदेड | हादगाव | ग्रामीण |
| १८३ | मुंबई | विक्रोळी-(कांजूरमार्ग) | नागरी | २२१ | नांदेड | नांदेड | ग्रामीण |
| १८४ | मुंबई | वडाळा-शिवडी | नागरी | २२२ | नांदेड | किनवट | ग्रामीण |
| १८५ | मुंबई | खार, सांताक्रुझ | नागरी | २२३ | नांदेड | मुखेड | ग्रामीण |
| १८६ | मुंबई | कुलाबा | नागरी | २२४ | नांदेड | देगलूर | ग्रामीण |
| १८७ | मुंबई | बोरिवली-१ | नागरी | २२५ | नांदेड | नायगाव (खिरगाव) | ग्रामीण |
| १८८ | मुंबई | बोरिवली-२ | नागरी | २२६ | नांदेड | मुदखेड | ग्रामीण |
| १८९ | मुंबई | माहिम | नागरी | २२७ | नंदूरबार | अक्कलकुवा | आदिवासी |
| १९० | मुंबई | मीरा -भाईदर+विरार | नागरी | २२८ | नंदूरबार | नंदूरबार | आदिवासी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २२९ | नंदूरबार | नवापूर | आदिवासी | २७० | पुणे | मुळशी | ग्रामीण |
| २३० | नंदूरबार | शहादा | ग्रामीण | २७१ | पुणे | खेड | ग्रामीण |
| २३१ | नंदूरबार | तळोदा | आदिवासी | २७२ | पुणे | पिंपरी (शहर) | नागरी |
| २३२ | नासिक | चांदवड | ग्रामीण | २७३ | पुणे | पुणे केंद्र | नागरी |
| २३३ | नासिक | मालेगाव (शहर) | नागरी | २७४ | पुणे | पुणे-१ (शहर) | नागरी |
| २३४ | नासिक | मालेगाव | ग्रामीण | २७५ | पुणे | पुणे-२ (शहर) | नागरी |
| २३५ | नासिक | नासिक (शहर) | नागरी | २७६ | पुणे | पुरंदर | ग्रामीण |
| २३६ | नासिक | त्र्यंबकेश्वर | आदिवासी | २७७ | पुणे | शिरुर | ग्रामीण |
| २३७ | नासिक | सुरगणा | आदिवासी | २७८ | पुणे | शिवाजीनगर | नागरी |
| २३८ | नासिक | इगतपुरी | आदिवासी | २७९ | पुणे | वेल्हे | ग्रामीण |
| २३९ | नासिक | कळवण | आदिवासी | २८० | रायगड | अलिबाग | ग्रामीण |
| २४० | नासिक | पेंट | आदिवासी | २८१ | रायगड | कर्जत | आदिवासी |
| २४१ | नासिक | सिन्नर | ग्रामीण | २८२ | रायगड | खालापूर | ग्रामीण |
| २४२ | नासिक | बागलन | ग्रामीण | २८३ | रायगड | महाड | ग्रामीण |
| २४३ | नासिक | दिंडोरी | आदिवासी | २८४ | रायगड | माणगाव | ग्रामीण |
| २४४ | नासिक | हरसूल | आदिवासी | २८५ | रायगड | म्हालसा | ग्रामीण |
| २४५ | नासिक | नाशिक | आदिवासी | २८६ | रायगड | मुरुड | ग्रामीण |
| २४६ | नासिक | नांदगांव | ग्रामीण | २८७ | रायगड | पनवेल | ग्रामीण |
| २४७ | नासिक | येवला | ग्रामीण | २८८ | रायगड | पेण | ग्रामीण |
| २४८ | नासिक | निफाड | ग्रामीण | २८९ | रायगड | पोलादपूर | ग्रामीण |
| २४९ | नासिक | देवळा | आदिवासी | २९० | रायगड | रोहा | ग्रामीण |
| २५० | परभणी | गंगाखेड | ग्रामीण | २९१ | रायगड | श्रीवर्धन | ग्रामीण |
| २५१ | परभणी | पाथरी | ग्रामीण | २९२ | रायगड | सुधागड पाली | ग्रामीण |
| २५२ | परभणी | जिंतूर | ग्रामीण | २९३ | रायगड | उरण | ग्रामीण |
| २५३ | परभणी | पालम | ग्रामीण | २९४ | रायगड | तळा | ग्रामीण |
| २५४ | परभणी | पुमा | ग्रामीण | २९५ | रत्नागिरी | दापोली | ग्रामीण |
| २५५ | परभणी | परभणी | ग्रामीण | २९६ | रत्नागिरी | गुहागर | ग्रामीण |
| २५६ | परभणी | सेलू | ग्रामीण | २९७ | रत्नागिरी | खेड | ग्रामीण |
| २५७ | परभणी | परभणी+ हिंगोली | नागरी | २९८ | रत्नागिरी | लांजा | ग्रामीण |
| २५८ | परभणी | मानवत | ग्रामीण | २९९ | रत्नागिरी | मंडणगड | ग्रामीण |
| २५९ | पुणे | आंबेगाव | ग्रामीण | ३०० | रत्नागिरी | राजापूर | ग्रामीण |
| २६० | पुणे | बारामती | ग्रामीण | ३०१ | रत्नागिरी | रत्नागिरी | ग्रामीण |
| २६१ | पुणे | भोर | ग्रामीण | ३०२ | रत्नागिरी | चिपळूण | ग्रामीण |
| २६२ | पुणे | दापोडी+ बापोडी | नागरी | ३०३ | रत्नागिरी | संगमेश्वर | ग्रामीण |
| २६३ | पुणे | दौंड | नागरी | ३०४ | सांगली | आटपाडी | ग्रामीण |
| २६४ | पुणे | घोरपडी+ कोंडवा | नागरी | ३०५ | सांगली | जत | ग्रामीण |
| २६५ | पुणे | हवेली | ग्रामीण | ३०६ | सांगली | कवठे महांकाळ | ग्रामीण |
| २६६ | पुणे | इंदापूर | ग्रामीण | ३०७ | सांगली | खानापूर | ग्रामीण |
| २६७ | पुणे | जुन्नर | आदिवासी | ३०८ | सांगली | मिरज | ग्रामीण |
| २६८ | पुणे | कोथरुड | नागरी | ३०९ | सांगली | सांगली (शहर) | नागरी |
| २६९ | पुणे | वडगाव मावळ | ग्रामीण | ३१० | सांगली | शिराळा | ग्रामीण |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३११ | सांगली | तासगाव | ग्रामीण | ३५० | ठाणे | कल्याण | ग्रामीण |
| ३१२ | सांगली | वाळवा | ग्रामीण | ३५१ | ठाणे | मुरबाड | आदिवासी |
| ३१३ | सांगली | पळूस | ग्रामीण | ३५२ | ठाणे | मोखाडा | आदिवासी |
| ३१४ | सातारा | जावळी | ग्रामीण | ३५३ | ठाणे | पालघर | ग्रामीण |
| ३१५ | सातारा | कराड | ग्रामीण | ३५४ | ठाणे | शहापूर | आदिवासी |
| ३१६ | सातारा | खंडाळा | ग्रामीण | ३५५ | ठाणे | तलासरी | आदिवासी |
| ३१७ | सातारा | खटाव | ग्रामीण | ३५६ | ठाणे | ठाणे | नागरी |
| ३१८ | सातारा | कोरेगाव | ग्रामीण | ३५७ | ठाणे | ठाणे (शहर) | नागरी |
| ३१९ | सातारा | महाबळेश्वर | ग्रामीण | ३५८ | ठाणे | ठाणे | ग्रामीण |
| ३२० | सातारा | माण (दहीवडी) | ग्रामीण | ३५९ | ठाणे | उल्हासनगर | ग्रामीण |
| ३२१ | सातारा | पाटण | ग्रामीण | ३६० | ठाणे | उल्हासनगर (शहर ) | नागरी |
| ३२२ | सातारा | फलटण | ग्रामीण | ३६१ | ठाणे | वसई | ग्रामीण |
| ३२३ | सातारा | सातारा | ग्रामीण | ३६२ | ठाणे | विक्रमगड | आदिवासी |
| ३२४ | सातारा | वाई | ग्रामीण | ३६३ | ठाणे | वाडा | आदिवासी |
| ३२५ | सोलापूर | सोलापूर+पंढरपूर | नागरी | ३६४ | ठाणे | तुर्भे +पनवेल+नवी मुंबई | नागरी |
| ३२६ | सोलापूर | अक्कलकोट | ग्रामीण | ३६५ | ठाणे | ठाणे-३ | नागरी |
| ३२७ | सोलापूर | बार्शी | ग्रामीण | ३६६ | ठाणे | उल्हासनगर+बदलापूर | नागरी |
| ३२८ | सोलापूर | करमळा | ग्रामीण | ३६७ | ठाणे | भिवंडी+ निजामपूर | नागरी |
| ३२९ | सोलापूर | माढा | ग्रामीण | ३६८ | वर्धा | आरवी | ग्रामीण |
| ३३० | सोलापूर | माळशिरस | ग्रामीण | ३६९ | वर्धा | आष्टी (पश्चिम) | ग्रामीण |
| ३३१ | सोलापूर | मंगळवेढा | ग्रामीण | ३७० | वर्धा | देवळी | ग्रामीण |
| ३३२ | सोलापूर | मोहोल | ग्रामीण | ३७१ | वर्धा | हिंगणघाट | ग्रामीण |
| ३३३ | सोलापूर | सांगोला | ग्रामीण | ३७२ | वर्धा | करंजा | ग्रामीण |
| ३३४ | सोलापूर | सोलापूर (शहर) | नागरी | ३७३ | वर्धा | समुद्रपूर | ग्रामीण |
| ३३५ | सोलापूर | पंढरपूर | ग्रामीण | ३७४ | वर्धा | सेलू | ग्रामीण |
| ३३६ | सोलापूर | उत्तर सोलापूर | ग्रामीण | ३७५ | वर्धा | हिंगणघाट+आर्वी+वर्धा+ पुलगाव | नागरी |
| ३३७ | सोलापूर | दक्षिण सोलापूर | ग्रामीण | ३७६ | वर्धा | वर्धा | ग्रामीण |
| ३३८ | सिंधुदूर्ग | देवगड | ग्रामीण | ३७७ | वासिम | करंजा | ग्रामीण |
| ३३९ | सिंधुदर्ग | कणकवली | ग्रामीण | ३७८ | वासिम | मालेगाव | ग्रामीण |
| ३४० | सिंधुदूर्ग | कुडाळ | ग्रामीण | ३७९ | वासिम | मंगळूर पीर | ग्रामीण |
| ३४१ | सिंधुदर्ग | मालवण | ग्रामीण | ३८० | वासिम | मनोरा | ग्रामीण |
| ३४२ | सिंधुदूर्ग | सावंतवाडी | ग्रामीण | ३८१ | वासिम | रिसोड | ग्रामीण |
| ३४३ | सिंधुदर्ग | वैभववाडी | ग्रामीण | ३८२ | वासिम | वाशिम | नागरी |
| ३४४ | सिंधुदर्ग | वेंगुर्ला | नागरी | ३८३ | यवतमाळ | यवतमाळ | नागरी |
| ३४५ | ठाणे | भिवंडी | नागरी | ३८४ | यवतमाळ | नेर | ग्रामीण |
| ३४६ | ठाणे | भिवंडी | ग्रामीण | ३८५ | यवतमाळ | उमरखेड | ग्रामीण |
| ३४७ | ठाणे | डहाणू | ग्रामीण | ३८६ | यवतमाळ | दारव्हा | ग्रामीण |
| ३४८ | ठाणे | जव्हार | आदिवासी | ३८७ | यवतमाळ | बाहुलगाव | ग्रामीण |
| ३४९ | ठाणे | कल्याण | नागरी | ३८८ | यवतमाळ | दिग्रस | ग्रामीण |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३८९ | यवतमाळ | पांढरकवडा | ग्रामीण | ४०३ | औरंगाबाद | औरंगाबाद (शहर) | नागरी |
| ३९० | यवतमाळ | पुसद | ग्रामीण | ४०४ | औरंगाबाद | गंगापूर | ग्रामीण |
| ३९१ | यवतमाळ | राळेगाव | आदिवासी | ४०५ | औरंगाबाद | कन्नड | ग्रामीण |
| ३९२ | यवतमाळ | यवतमाळ | ग्रामीण | ४०६ | औरंगाबाद | खुल्दाबाद | ग्रामीण |
| ३९३ | यवतमाळ | घाटंजी | ग्रामीण | ४०७ | औरंगाबाद | सिल्लोड | ग्रामीण |
| ३९४ | यवतमाळ | कळंब | ग्रामीण | ४०८ | औरंगाबाद | सोयेगाव | ग्रामीण |
| ३९५ | यवतमाळ | वणी | ग्रामीण | ४०९ | बीड+ उस्मानाबाद | आंबेजोगाई+परळी +उस्मानाबाद | नागरी |
| ३९६ | यवतमाळ | मारेगाव | ग्रामीण | ४१० | उस्मानाबाद | लोहारा | ग्रामीण |
| ३९७ | यवतमाळ | महागाव | ग्रामीण | ४११ | उस्मानाबाद | तुळजापूर | ग्रामीण |
| ३९८ | यवतमाळ | आर्णी | नागरी | ४१२ | उस्मानाबाद | उमरगा | ग्रामीण |
| ३९९ | औरंगाबाद | फुलांबरी | ग्रामीण | ४१३ | उस्मानाबाद | उस्मानाबाद | ग्रामीण |
| ४०० | औरंगाबाद | औरंगाबाद | ग्रामीण | ४१४ | उस्मानाबाद | परंदा | ग्रामीण |
| ४०१ | औरंगाबाद | वैजापूर | ग्रामीण | ४१५ | उस्मानाबाद | भूम | ग्रामीण |
| ४०२ | औरंगाबाद | पैठण | ग्रामीण | ४१६ | उस्मानाबाद | कळंब | ग्रामीण |

------